सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# भारतीय प्रशासकिय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर

**जूने मॉरिस कॉलेज परिसर, सिव्हिल लाईन, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१**

दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५६२६ फॅक्स क्रमांक ०७१२-२५६५६२६

E-Mail directoriasngp@rediffmail.com Web site-www.preiasnagpur.org.in

जा. क्रमांक/आयएएस/संचालक/जाहिरात/२०१९/ दिनांक १३.०६.२०१९

**भोजन व्यवस्थेकरीता जाहिरात**

या संस्थेत मुला/मुलींच्या वसतिगृहातील १००+१०+१०=असे एकूण १२० विद्यार्थी प्रवेशित असून सदर विद्यार्थ्यांची या संस्थेच्या वसतिगृहातील मेस मध्ये भोजन तयार करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी मोहरबंद पाकिटातून दिनांक २१.०६.२०१९ पर्यत निविदा मागविण्यात येत आहे.

इच्छुक व अनुभवी कंत्राटदारंनी कार्यालीन वेळेत विहित नमुन्यातील अर्ज रु. २००/- भरुन प्राप्त तथा अटी व शर्तीच्या अधीन राहून विहीत मदतीत निविदा कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावी.

१. निविदा वितरणाचा दिनांक :- निविदा प्रकाशित झाल्याचा दुसा-या दिवशी दिनांक १७.०६.२०१९ पासून
२. निविदा स्वीकारणाचा अंतिम दिनांक :- २४.०६.२०१९
३. निविदा उघडण्याचा दिनांक :- २५.०६.२०१९ दु. ०३.०० वा.(माध्यान्होत्तर)
४. निविदा उघडण्याचे स्थळ :- संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर

सविस्तर जाहीरात ही संस्थेच्या **www.preiasnagpur.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यात नमूद केलेल्या अटी वशर्तीच्य आधीन राहूनच निविदा भरावी.

दिनांक :- १३/०६/२०१९

स्वाक्षरी/-
**(डॉ. प्रमोद के लाखे)**
प्र. संचालक
भारतीय प्रशासकीय सेवा
पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर

## मेस सुविधे बाबत अटी व शर्ती

१. पुरवठादार हा नागपूर महानगर पालिका क्षेत्रातील असावा.

२. पुरवठादार हा दुकान व आस्थापना (गुमास्ता) अंतर्गत नोंदणीकृत असावा. (सत्य प्रत सोबत जोडावी)

३. पुरवठादाराचा पॅन कार्ड नंबर असावा (सत्य प्रत सोबत जोडावी)

४. पुरवठादार फर्म जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत असावा. (सत्य प्रत सोबत जोडावी)

५. पुरवठादार हा अन्न व औषधी विभागा अंतर्गत नोंदणीकृत असावा. (सत्य प्रत सोबत जोडावी)

६. दरपत्रक सादर करतेवेळी अनामत रक्कम १०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार फक्त) राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष अर्जासोबत सादर करावा, धनाकर्ष Director, I.A.S. Coaching Centre, Nagpur यांचे नावे असावा.

७. मेसचा कालावधी माहे जुलै २०१९ ते माहे जून २०२० पर्यत राहील.

८. मेस मधील नास्ता व चहाची वेळ स. ०८.०० ते स. ९.३० पर्यत व साय. ४.३० ते ५.३० वाजेपर्यत तसेच भोजनाची वेळ दुपारी १२.०० ते दुपारी २.०० पर्यत आणि रात्री ७.३० ते ९.३० पर्यत राहील.

९. भोजनाबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास, मेस बंद करण्याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर यांना असतील. त्यांचा निर्णय अंतिम असेल.

१०. भोजन कक्ष, स्वयंपाक घर तथा आजूबाजूचा परिसर,पिण्याच्या पाण्याची जागा तसेच वॉश बेसीन स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मेस चालकाची राहील.

११. मेस मधील कामगार हे अल्पवयीन (१८ वर्षापेक्षा) लहान नसावेत. मेसमध्ये काम करणा-या कोणत्याही कर्मचारी/कामगारावर पोलीस चौकशी प्रलंबित नसावी.

१२. भोजन तयार करण्यासाठी शुध्द गोड्या तेलाचा वापर करावा तसेच इतर स्वयंपाकाची सामुग्री उच्च प्रतीची असावी.

१३. वसतिगृह अधिक्षक यांच्या पूर्वपरवानगी शिवाय, नियमित नोकर वर्गाशिवाय इतर कोणालाही मेसमध्ये प्रवेश राहणार नाही. तसेच दररोज रात्री किमान एक तथा आवश्यक प्रसंगी जास्तीत जास्त दोन व्यक्तीना राहण्याची परवानगी राहील.

१४. वसतिगृह बाहेरून आलेल्या पाहुण्याकडून प्रती थाली रु. ६०/- शुल्क आकारावेत.

१५. मेस मधील कामगार व्यसनमुक्त असावेत, तसेच दर ६ महिन्यानी वैद्यकीय तपासणी करुन अहवाल कार्यालयात सादर करावा. अन्यथा आपणावर कार्यवाही करण्यात येईल.

१६. मेस मध्ये दर महिन्याला फक्त ४ खाडे प्रती विद्यार्थी मान्य राहील.

१७. वसतिगृह अधिक्षक/संचालक यांनी आकस्मिक भेट देऊन तपासणी केली असता यांनी भोजनासंबधी दिलेला अहवाल अंतिम धरला जाईल.

१८. फिस्टच्या दिवशी सायंकाळच्या जेवणात खिचडी/मसाले भात व कडी, देण्यात यावा. या दिवशी मेस सायंकाळी बंद ठेवता येणार नाही.

१९. यापूर्वी शासकीय कार्यालय तथा शासकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहातील मेस चालविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. तसेच किमान दोन राजपत्रीत अधिका-यांचे शिफारस पत्र सोबत जोडावे. (अनुभव प्रमाणपत्राची प्रत जोडावी)

२०. उरलेले अन्न तथा खरकट यांचे योग्य व्यवस्थापन असावे, कुठल्याही परिस्थितीत ते संस्थेच्या परिसरात टाकता/ठेवता येणार नाही.

२१. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचे कार्यालयाने निर्धारीत करुन दिलेला जागेचा किराया, विद्युत तथा पाणी चार्ज दरमहिन्याच्या ५ तारखेपर्यत या कार्यालयात जमा करावा लागेल.

२२. दररोजच्या नास्ता व भोजनाचे मेनू खालील प्रमाणे असले.

**नास्ता व भोजनाचे मेनू (नियमीत जेवण)**

| अ.क्र. | तपशील (नास्ता) | तपशील (भोजन) |
|---|---|---|
| १ | इडली/वडा/आलूपोहा/आलूभजी/कांदेभजी | चपाती (शरबती/एमपी बोट गव्हाची) |
| २ | चहा/दूध/कॉफी | भात (उच्च प्रतीचे) |
| ३ | | वरण/दालफ्राय |
| ४ | | सूकी भाजी |
| ५ | | रस्सा भाजी |
| ६ | | लोणचे/पापड |
| ७ | | सलाद/कोशिंबीर |

**आठवड्यातून एकदा Feast**

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | पराठा/पुरी |
| २ | जिरा भात/साधा भात/मसाले भात |
| ३ | दाल फ्राय |
| ४ | भाजी (पनीर डिश) |
| ५ | स्वीट डिश (गुलाब जाम, रसगुल्ला, हलवा, खीर, जिलेबी) |

वरील सर्व अटी मला मान्य आहेत.

आपला विश्वासू

स्वाक्षरी

नाव :

फर्मचा शिक्का :

संपर्क क्रमांक :

**चेकलिस्ट**

| अ.क्र. | विषय | होय/नाही |
|---|---|---|
| १ | दुकान व आस्थापना अंतर्गत नोंदणीची सत्यप्रत | |
| २ | पुरवठादाराच्या Pan Card ची सत्यप्रत | |
| ३ | GST ची सत्यप्रत | |

| अ.क्र. | विषय | होय/नाही |
|---|---|---|
| ४ | १०,०००/- चे DD | |
| ५ | अन्न व औषधी विभागा अंतर्गत नोंदणीची सत्यप्रत | |
| ६ | स्वाक्षरी शिक्का व संपर्क क्रमांक | |